**आकाशवाणी पुणे**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी ०६.०० वा.**

**दिनांक – १६/०२/२०२५** **वार – रविवार**

साखर हंगाम

राज्यातला साखर हंगाम आता अखेरच्या टप्प्यात आला आहे. आतापर्यंत सुमारे ६१ लाख टन साखरेचं उत्पादन झालं असून, १४ कारखान्यांनी आपली धुराडी बंद केली आहेत. सर्वाधिक १७ लाख टन साखर उत्पादन कोल्हापूर विभागात झालं; तर पुणे विभागात १४ लाख टन साखर उत्पादित करण्यात आली. यंदा राज्यात ८५ लाख टन साखर उत्पादनाचा अंदाज व्यक्त करण्यात आला होता; मात्र विविध कारणामुळे साखर उत्पादन अंदाजापेक्षा कमी होईल, तसंच यंदा गेल्या वर्षीच्या तुलनेत साखर गाळप हंगाम लवकर संपेल, असं साखर आयुक्तालयानं म्हटलं आहे.

आरोग्य पत्र

सध्याच्या धावपळीच्या आणि ताण-तणावाच्या जगात पत्रकारांनी आरोग्याकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यायला हवं, असा सल्ला केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आज पुण्यात दिला. पुणे श्रमिक पत्रकार संघ आणि क्रस्ना डायग्नोस्टीक्स यांच्या सहकार्याने पत्रकारांना आरोग्य पत्रांचं वितरण मोहोळ यांच्या हस्ते करण्यात आलं; त्यावेळी ते बोलत होते. पत्रकार संघाचे अध्यक्ष सुनीत भावे, क्रस्ना डायग्नोस्टिकचे अध्यक्ष राजेंद्र मुथा यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते.

न्यायालय

नवीन वकिलांनी पक्षकारांना न्याय मिळवून देण्याच्या दृष्टीने सतत अध्ययन करायला हवं असं प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे यांनी आज केलं. जुन्नर इथं जिल्हा आणि अतिरिक्त सत्र न्यायाधीश आणि दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर या न्यायालयाचं उद्घाटन न्यायमूर्ती डेरे यांच्या हस्ते झालं. त्यावेळी त्या बोलत होत्या.

उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते.

पिफ

चित्रपटांचं सध्या खूप बाजारीकरण झालं आहे; मात्र आपल्याला साधे आणि खरे चित्रपट तयार करायचे आहेत, असं तमिळ दिग्दर्शक सीनू रामासामी यांनी आज पुण्यात सांगितलं. २३व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात भारतीय चित्रपट विभागात रामासामी यांनी दिग्दर्शित केलेला तमिळ भाषेतला ‘कोझीपण्णाई चेल्लादुराई’ हा चित्रपट दाखवण्यात आला. या चित्रपटाच्या निमित्ताने रामासामी यांनी आज रसिकांशी संवाद साधला.

केळकर संग्रहालय

पाश्चिमात्त्य संगीताचा उत्तम वापर करणारे ज्येष्ठ संगीतकार सी. रामचंद्र यांच्या वापरातला दुर्मीळ पियानो आज पुण्यातल्या राजा दिनकर केळकर संग्रहालयाला सुपूर्द करण्यात आला. सुरेश यादव यांनी हा पियानो संग्रहालयाकडे सुपूर्द केला. या पियोनेचं सुयोग्य जतन राजा दिनकर केळकर संग्रहालयामध्ये होईल आणि पुढच्या पिढ्यांना तो पाहता येईल या सद्भावनेने हा निर्णय घेतला असल्याचं सुरेश यादव यांनी सांगितलं.

पारितोषिक वितरण

मनाची शांतता, एकाग्रता आणि व्यक्तिमत्त्वाची जडण घडण, याबरोबरच अभ्यासासाठीही संगीताचा रियाज उपयुक्त ठरतो; त्यामुळे त्यासाठी वेळ काढला पाहिजे, असं मत प्रसिद्ध शास्त्रीय गायिका सानिया पाटणकर यांनी पुण्यात व्यक्त केलं. डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या सांस्कृतिक समितीनं आयोजित केलेल्या हिंदुस्तानी शास्त्रीय संगीत स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभात त्या बोलत होत्या. संस्थेचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावर आयोजित या स्पर्धेत १६० विद्यार्थी सहभागी झाले होते.

व्याख्यान

कृत्रिम बुद्धिमत्तेचा सकारात्मक वापर केला तर शैक्षणिक क्षेत्र, माहिती संकलन, शेती अशा विविध क्षेत्रात अनेक संधी उपलब्ध होऊ शकतात, असं प्रतिपादन ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ दीपक

शिकारपूर यांनी पुण्यात केलं. ए. आय. तंत्रज्ञानाला स्पर्धक नव्हे मदतनीस समजा आणि सजग वापरकर्ते व्हा, असा सल्लाही त्यांनी दिला. पुणे नगर वाचन मंदिरानं आयोजित केलेल्या व्याख्यानात ते बोलत होते.

अतिक्रमण निर्मूलन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेनं चिखली - कुदळवाडी इथं गेले सलग आठ दिवस अतिक्रमण निर्मूलनाची कारवाई केली. १९२ एकर जागेतल्या ६३३ अनधिकृत पत्राशेड बांधकामांवर ही कारवाई करण्यात आली.

बाजार समिती

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध राज्यातून नव्वद ट्रक फळभाज्यांची आवक झाली. मागणी आणि आवक टिकून असल्याने बहुतांश फळभाज्यांचे दर स्थिर आहेत. उन्हाळी रसाळ फळांना मागणी वाढली आहे. गेल्या आठवड्याच्या तुलनेत या आठवड्यात फुल बाजारातही तेजीचं वातावरण आहे.

स्नूकर

पुण्यात सुरू असलेल्या स्नूकर मानांकन स्पर्धेत रोहीत लोणकर, कार्तिक द्विवेदी, ओम पांडे, अमीर उसगांवकर, अस्लम खलील आणि हिसान सय्यद या खेळाडूंनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून स्पर्धेच्या मुख्य ड्रॉमध्ये प्रवेश केला.

हवामान

पुणे आणि परिसरात आज कमाल 36 अंश तर किमान 12 पूर्णांक 8 दशांश अंश सेल्सियस तापमान नोंदवलं गेलं. उद्याही साधारण असंच तापमान राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू संध्याकाळी ०६.०० वाजता, विविध भारती पुणे केंद्रावर, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.